# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date: 15 May 2024

# Time: 7.10 AM to 7.20 AM

# Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १५ मे २०२४ सकाळी ७.१० मि.

****

*ठळक बातम्या*

- **लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याचा प्रचार शिगेला; भाजप नेते, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आज राज्यात दोन सभा**
- **निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी अर्ज दाखल करण्याची मुदत संपली**
- **राज्यात विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघासाठीची निवडणूक लांबवणीवर**
- **मुंबईत जाहिरात फलक कोसळल्याप्रकरणी फलकाचा मालक भावेश भिडे आणि इतरांवर गुन्हा दाखल**

**आणि**

- **मराठवाड्यासह राज्याच्या बहुतांश *भागात येत्या दोन दिवसात वादळी वाऱ्यासह पावसाचा हवामान खात्याचा इशारा***

***सविस्तर बातम्या***

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी प्रचाराला थोडेच दिवस शिल्लक असल्यानं प्रचार शिगेला पोहोचला आहे. या टप्प्यात राज्यातल्या धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे आणि मुंबईतल्या सहा मतदारसंघांचा समावेश आहे. या मतदारसंघात येत्या २० तारखेला मतदान होणार आहे.

भाजप नेते, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आज राज्यात दोन सभा होणार आहेत. दुपारी एक वाजता नाशिक जिल्ह्यात निफाड तालुक्यातल्या पिंपळगाव बसवंत इथं मोदी यांची सभा होईल. त्यानंतर कल्याण इथं महायुतीचे उमेदवार श्रीकांत शिंदे

यांच्या प्रचारार्थ ते सभेला संबोधित करतील. संध्याकाळी पंतप्रधान मुंबईत घाटकोपर इथं रोड शो करणार आहेत.
तसंच, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या सभांचंही आज नाशिकमध्ये आयोजन करण्यात आलं आहे.

****

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दक्षिण – मध्य मुंबई लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार राहुल शेवाळे यांच्या प्रचारासाठी काल चेंबूर इथं सभा घेतली.
उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पालघर लोकसभा मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार हेमंत सावरा यांच्या प्राचारार्थ डहाणू इथं सभा घेतली.
तर महाविकास आघाडीच्या उमेदवार भारती कामडी यांच्या प्राचारासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची काल वसई इथं सभा झाली.

****

लोकसभा निवडणुकीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यात ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेले आणि दिव्यांग अशा दोन हजार २९० मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला.

****

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपली. अर्जांची छाननी आज होणार असून, येत्या १७ तारखेपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. सातव्या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशात एकूण ५७ लोकसभा मतदारसंघासाठी एक जून रोजी मतदान होणार आहे.

****

भाजपचे ज्येष्ठ नेते, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल वाराणसी लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. हिमाचल प्रदेशातल्या मंडी लोकसभा मतदारसंघातून अभिनेत्री कंगना रानौत, तर चंदीगढमधून काँग्रेस नेते मनीष तिवारी यांनी देखील उमेदवारी अर्ज भरला.

****

राज्यात विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघासाठीची निवडणूक लांबवणीवर टाकण्यात आली आहे. निवडणूक आयोगानं राज्यातल्या दोन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघासाठी १० जून ही तारीख निश्चित केली होती. मात्र, उन्हाळी सुट्ट्यानंतर ही निवडणूक घेण्यासाठी विनंती अर्ज प्राप्त झाले, त्यानुसार ही निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. आयोगाकडून निवडणुकीची सुधारीत तारीख नंतर कळवण्यात येईल.

****

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात १३ तारखेला पार पडलेल्या मतदानानंतर मतदान यंत्रं स्ट्राँग रूममध्ये जमा करण्याची प्रक्रिया पोलीस बंदोबस्तात पूर्ण झाली.

जालना लोकसभा मतदारसंघातली सगळी मतदान यंत्रं जालना औद्योगिक वसाहतीमधल्या सरस्वती ऍटो कंपोनंट्स या ठिकाणी जमा करण्यात येत आहेत. येत्या चार जून रोजी या ठिकाणी मतमोजणी होणार आहे.

बीड लोकसभा मतदारसंघातही मतदान यंत्रं स्ट्राँग रूममध्ये जमा करण्यात आली आहेत. हा सगळा परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणीखाली असेल, अशी माहिती, जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी दिली.

****

‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण 'उत्तर - मध्य मुंबई' लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

मुंबईत घाटकोपरच्या छेडा नगर इथं वादळी वाऱ्यामुळे लोखंडी जाहिरात फलक कोसळल्याप्रकरणी फलकाचा मालक भावेश भिडे आणि इतरांवर काल गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती, पंतनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश केवळे यांनी दिली. या दुर्घटनेत १४ जणांचा मृत्यू झाला, तर बेचाळीस जण जखमी झाले. ३२ जणांवर उपचार करून त्यांना रुग्णालयातून सोडण्यात आलं.

दुर्घटना स्थळी अजूनही एनडीआरएफ, पोलीस, सीआरपीएफ, आणि अग्निशमन दलाचे जवान बचावकार्य करत आहेत. फलकाच्या खाली अजूनही अनेक गाड्या

अडकल्या आहेत, आणि फलकाचं वजन जास्त असल्यामुळे क्रेनच्या मदतीनं ते उचलण्यावर मर्यादा येत असल्याची माहिती बचाव पथकातल्या कर्मचाऱ्यांनी दिली.

****

दरम्यान, या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या विविध शहरांमध्ये काल स्थानिक प्रशासनानं होर्डिंग्सच्या मालकांना त्याचं स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचे निर्देश दिले आहेत.

नांदेड शहरातले सर्व बॅनर आणि बॅनरच्या ठिकाणाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी दिले आहेत. शहरात बॅनरसाठी १५१ ठिकाणं अधिकृत आहेत. अनाधिकृत बॅनरचं सर्वेक्षण करून कारवाईच्या सूचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. पुणे, बारामती तसंच कल्याण-डोंबिवली मध्ये देखील फलकाचं ऑडिट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

****

भीमा कोरेगाव प्रकरणी अटकेत असलेले गौतम नवलखा यांना सर्वोच्च न्यायालयानं काल जामीन मंजूर केला. नवलखा हे चार वर्षांपासून कैदेत होते. या प्रकरणी अद्याप त्यांच्यावर आरोपही निश्चित झालेले नाहीत. या प्रकरणाची सुनावणी आणखी लांबणार असल्याचं मत नोंदवत न्यायलयानं हा जामीन मंजूर केला. गौतम नवलखा यांना राहत्या घरीच झालेल्या नजरकैदेच्या सुरक्षेसाठीचा वीस लाख रुपयांचा खर्च भरण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

****

छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती काल राज्यभरात विविध कार्यक्रमांनी साजरी झाली.

छत्रपती संभाजीनगर शहरातल्या टीव्ही सेंटर इथल्या चौकात छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याला विविध सामाजिक आणि शैक्षणिक संघटनांनी अभिवादन केलं. महाराजांची वेशभूषा केलेल्या बालकांनी उपस्थितांचं लक्ष वेधून घेतलं होतं. जयंतीनिमित्त निघालेल्या मिरवणुकीत महिला आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

हिंगोली तसंच नांदेड जिल्ह्यातही छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन करण्यात आलं.

****

नाशिक जिल्ह्यात नांदगाव इथं काल कार आणि बस यांच्यात झालेल्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला, तर तीन वर्षाचा मुलगा बचावला. नांदगाव–संभाजीनगर रस्त्यावर गंगाधरी गावाजवळ हा अपघात झाला.

****

जालना तालुक्यातल्या सिंधीकाळेगाव इथल्या जालना सहकारी जिनिंगला काल सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास आग लागली. अग्निशमन दलाच्या सहा बंबाच्या सहाय्याने आग विझवण्यात आली. या घटनेत कापूस, कापूस गाठी आणि इतर साहित्य जळाल्यानं मोठं नुकसान झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

जालना जिल्ह्यात काल सायंकाळच्या सुमारास काही भागात वादळी वाऱ्यासह मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला. भोकरदन तालुक्यातल्या चिंचोली इथं वीज कोसळून मुरलीधर शेळके या शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. तर जिल्ह्यात वीज कोसळल्याच्या अन्य तीन घटनांमध्ये चार जनावरांचा मृत्यू झाल्याची माहिती प्रशासनानं दिली आहे.

छत्रपती संभाजीनगर, आणि धाराशिव जिल्ह्यात काल दुपारी काही ठिकाणी पाऊस झाला.

दरम्यान, मराठवाड्यासह राज्याच्या बहुतांश भागात येत्या दोन दिवसात वादळी वाऱ्यासह पाऊस पडणार असल्याचा इशारा हवामान खात्यानं दिला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, धाराशिव जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी, ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

****

नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी यंत्रणांनी समन्वयातून काम करावं, असे निर्देश धाराशिवच्या निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांनी दिले आहेत. मान्सून पूर्वतयारी आढावा बैठकीत त्या काल बोलत होत्या. संकटात सापडलेल्या व्यक्तीला तात्काळ प्रतिसाद द्यावा, तसंच, ज्या विभागांना पावसाळ्यात नियंत्रण कक्ष सुरू करायचे असतात, त्या विभागांनी त्यांचं आतापासून नियोजन करावं, आदी सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

****

नांदेड इथून सुटणारी नांदेड - अमृतसर सचखंड एक्सप्रेस आज उशिरा सुटणार आहे. ही गाडी सकाळी साडेनऊ ऐवजी दुपारी चार वाजता सुटणार असल्याचं, दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क कार्यालयानं कळवलं आहे.

****